# लीलावती हॉस्पिटलमध्ये सुसज्ज ऑपरेशन थिएटर

▸ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. नवोन्मेष आणि अचूकतेची सांगड घालत शस्त्रक्रियेतील सुरक्षितता आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एलएचआरसी) यांनी अत्याधुनिक मोड्युलर आणि हायब्रिड ऑपरेशन थिएटर (ओटी) सुरू केले आहेत. नव्याने अद्ययावत करण्यात आलेल्या या सुविधांमध्ये प्रगत प्रणाली, सुलभ कार्यप्रवाह आणि सुधारित सुरक्षा मानकांचा समावेश आहे. सर्जन्सना अधिक सक्षम बनवणे आणि रुग्णांच्या सुरक्षिततेत वाढ करणे या उद्देशाने या आधुनिक ओटींची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले.



## अद्ययावत यंत्रणा सज्ज

शस्त्रक्रियात्मक उत्कृष्टतेच्या जागतिक मानकांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेल्या या नव्या ओटींमध्ये अत्याधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान, प्रगत रुग्ण निरीक्षण प्रणाली, अचूकतेसाठी आवश्यक देखरेख प्रणाली आणि सुधारित रुग्ण सुरक्षा उपायांचा समावेश आहे. या उद्घाटनामुळे जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधांमध्ये रुग्णालयाकडून सातत्याने केली जाणारी गुंतवणूक अधोरेखित होते.